# उपनिबंधक,सहकारी संस्था आर दक्षिण विभाग मुंबई यांचे कार्यालय

३०३,अे विंग, ३ रा मजला,बी एम सी गोडाऊन इमारत,संस्कृती कॉम्प्लेक्स जवळ,ठाकूर कॉम्प्लेक्स, ९० फुट रोड, कांदीवली (पूर्व) मुंबई ४०० १०१

## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७(अ) आदेश

**जा.क्र.मुंबई उपनि/आर दक्षिण विभाग/ १४८८ /२०१८.**

**दिनांक१७/५ /२०१८.**

वाचावे :१. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) दिनांक २७.०३.२०१८ रोजीचे आदेश.
२. प्राधिकृत अधिकारी यांचेकडील दिनांक १५.०५.२०१८ रोजीचे विनंती अर्ज.

ज्याअर्थी, न्यु हायवे पार्क ई/३ को ऑप हौ सोसा लि., ठाकूर कॉम्प्लेक्स, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, कांदीवली ( पूर्व) मुंबई-१०१ या संस्थेच्या व्यवस्थापक समितीमध्ये पोकळी निर्माण झालेली असल्यामुळे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ दिनांक २७.०३.२०१८ च्या आदेशान्वये प्राधिकृत अधिकारी श्री उमेद कांबळे, सहकारी अधिकारी श्रेणी-१ यांची नियुक्ती करण्यात आलेली होती. परंतु प्राधिकृत अधिकारी यांचेकडे कार्यालयीन कमाकाजाचा व्याप मोठया प्रमाणावर तसेच इतर संस्थांचे प्राधिकृत अधिकारी म्हणून कामकाज करीत असल्याचे नमुद केलेले आहे. त्यामुळे सदर संस्थेच्या कामकाज करणेसाठी इतर अधिकाऱ्याची नियुकती करणेबाबत संदर्भ क्र २ च्या पत्राने या कार्यालयास अवगत केलेले आहे. सबब प्राधिकृत अधिकारी यांच्याकडील कामाचा व्याप लक्षात घेता तसेच संदर्भ क्र १ अन्वये निर्गमित केलेल्या आदेशामध्ये अंशत: बदल करण्याची आवश्यकता असल्याची खात्री झाल्याने मी खालील प्रमाणे आदेश निर्गमित करणेत येत आहे.

### अंशत: बदल आ दे श

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी डॉ. अविनाश भागवत, उपनिबंधक, सहकारी संस्था, आर दक्षिण विभाग, मुंबई याद्वारे न्यु हायवे पार्क ई/३ को ऑप हौ सोसा लि., ठाकूर कॉम्प्लेक्स, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, कांदीवली (पूर्व) मुंबई-१०१ या संस्थेचे दैनंदिन कामकाज करणेसाठी श्री उमेद कांबळे, सहकारी अधिकारी श्रेणी-१ यांच्या ऐवजी श्री महेश बिभिषण थोरात प्रमाणित लेखापरिक्षक यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्त करीत आहे. प्राधिकृत अधिकारी यांनी संस्थेचे दैनंदिन कामकाज करीत असताना प्रतिमहा मानधन रुपये ५०००/- अधिक प्रवास खर्च संस्थेच्या एकत्रीत निधीतून खर्च करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदरचा, आदेश आज दि.१७/५ /२०१८ रोजी माझी सही व या कार्यालयाच्या मुद्रेसह दिला असे.

(डॉ. अविनाश भागवत)
उपनिबंधक,
सहकारी संस्था, आर दक्षिण विभाग, मुंबई

Scanned by CamScanner

**प्रत-**

१. **माजी. चेअरमन/सेक्रेटरी,** न्यु हायवे पार्क ई/३ को ऑप हौ सोसा लि., ठाकूर कॉम्प्लेक्स, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, कांदीवली (पूर्व) मुंबई-१०१

२. **श्री. उमेद कांबळे, सहकारी अधिकारी श्रेणी-१**

२/- **यांना कळविण्यात येते की संस्थेच्या दप्तराचा व मालमत्तेचा ताबा नियुक्त प्राधिकृत अधिकारी यांच्याकडे देण्यात यावा व तसा अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा.**

३. **श्री महेश बिभिषण थोरात , प्राधिकृत अधिकारी तथा प्रमाणित लेखापरीक्षक,** पॅनल नं. ११९३८

मो. नं. ९८७००२९४९५

यांना कळविणेत येते की, संस्थेच्या दप्तराचा व मालमत्तेचा ताबा संस्थेच्या माजी प्राधिकृत अधिकारी यांच्याकडून घेऊन तसा अवहाल या कार्यालयास सादर करण्यात यावा व संस्थेची निवडणूक घेण्यासाठी कार्यवाही त्वरीत सुरु करावी व कामकाजाचा अहवाल वेळोवेळी सादर करण्यात यावा.

4. शाखा व्यवस्थापक, सातारा सहकारी बँक मर्या., एच ओ. भारतीया क्रिडा मंदीर, 3 रा मजला, नायगाव वडाला रोड, वडाला, मुंबई-31

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**
मा.जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था-4 मुंबई

उपनिबंधक,
सहकारी संस्था, आर दक्षिण विभाग, मुंबई

Scanned by CamScanner